**<u>पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर</u>**

**प्रेस नोट दि.२३/०७/२०१९**

**<u>दि.२२/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**<u>भाग-१ ते ५ चे गुन्हे</u>**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे २२४/१९,भादविक ४०६,४२०,३४,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२२ वर्षे,रा.अप्पर इंदिरानगर,बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात दोन इसम व एक महिला मोबाईल व ई-मेलधारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०२/२०१९ रोजी ते दि.२५/०२/२०१९ रोजीचे कालावधीत फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे शिक्षण पुर्ण झाल्याने त्या चांगल्या नोकरीच्या शोधात असताना,त्यांनी इंटरनेटवरील Shine.com या संकेतस्थळावर त्यांचा रिझ्युम (बायोडाटा) लोड केला होता. त्या दरम्यान यातील नमुद अज्ञात दोन इसम व एक महिला मोबाईल व ई-मेलधारक यांनी त्यांचे मेल आयडीवरुन फिर्यादी यांचा मोबाईल व मेल आयडी यावर संपर्क करुन,त्यांना इंडीगो एअरलाईन्स या कंपनीमध्ये नोकरी देण्याचे आमिष दाखवुन,त्यांचा विश्वास संपादन करुन,फिर्यादी यांनी त्यांचे बॅकेचे खात्यावर वेळोवेळी वेग-वेगळया कारणांसाठी एकुण ८१,७००/- रुपये भरावायस लावुन,फिर्यादी यांना कोणत्याही प्रकारची नोकरी न देता फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा तक्रारी अर्जाची चौकशी करुन दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पो.निरी. एम.जी.करपे ९८७०२९८८७० |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ३४९/१९,भादविक ३८४,३८५,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-२६ रा.वानवडी,पुणे |
| **आरोपी** | १.भास्कर शिवाजी वाघमारे,वय-४०,रा.गुलटेडी,पुणे (अटक) व इतर तीन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/०५/२०१९ रोजी १०/२० वा. ते आजपावेतो स्वारगेट,पुणे येथील फर्निचर दुकाना मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे स्वारगेट,पुणे याठिकाणी फर्निचरचे दुकान असुन,सदर इसमांनी संगनमत करुन,फिर्यादी यांचे दुकाना समोर फर्निचर मालाची गाडी खाली न करता,सदर बाबत फिर्यादीस धमकी देवुन,त्यांचेकडुन १५,०००/- रुपये व इतर दुकानदारांकडुन ३२,०००/- रुपये खंडणी स्वरुपात मागणी करुन स्विकारली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.जे.कदम ९८२३६२४५८५ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे २२१/१९,भादविक ३८१ |
| **फिर्यादी** | मरीयम वालजी,वय-६७ वर्षे,रा.बोट क्लब रोड,पुणे |
| **आरोपी** | एक महिला कामगार,वय-२६ वर्षे,रा.नदी किनारी,ताडीवाला रोड,पुणे (संशईत) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/०७/२०१९ ते दि.२०/०७/२०१९ फिर्यादी यांचे राहते घरी बोट क्लब रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे राहते घरी घरकाम करणारी यातील नमुद महिला हिने घरकाम करीत असताना,फिर्यादी यांची नजर चुकवुन,त्यांचे घरातील लाकडी कपाटातील ड्रॉव्हर मधुन सोन्याची दागिने असा एकुण २,२७,०००/- रु किचा ऐवज चोरी करून नेल्याचा फिर्यादी यांचा संशय आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. मनिषा टुले ९९२३०७४२३१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे ७३/१९,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | अक्षय सरपाटील,वय-२६ वर्ष,रा.कोंढवे-धावडे,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | बिपीन रामसिंग पवार,वय-३८ वर्ष,रा.कुडजे,ता.हवेली,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२०/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/३० वा. ते सकाळी ०७/०० वा.चे दरम्यान हरितारा सोसा. कोंढवे-धावडे सोसायटीतील सी-विंग मधील फ्लॅट क्रं.६०५ मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे पुतण्या यांचे नावे असलेले हरितारा सोसायटी,कोंढवे-धावडे सोसायटीतील सी-विंग मधील फ्लॅट क्रं.६०५ मध्ये रात्री झोपले असता,यातील नमुद इसमाने फिर्यादीचे गळ्यातील १,७०,०००/- रु किची एक सोन्याची जाड चेन चोरी केली आहे. (फिर्यादी यांनी आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एल.व्हि.डेंगळे ९९२३०४८८१४ |

## दि.२३/०७/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे २६८/१९,भादविक ४५७,३८० |
| **फिर्यादी** | पवन कटारिया,वय-३७,रा.बाणेर,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०७/२०१९ रोजी २१/३० वा.ते दि.२३/०७/२०१९ रोजी सकाळी ०६/३० वा.चे दरम्यान शॉप नं.६१३, व ६१४ मध्ये भारत उलन हाऊस,सेवासदन बिल्डींग लक्ष्मी रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे शॉप नं.६१३, व ६१४ हे कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे दुकानाचे मुख्य काचेचा दरवाजा फोडुन,त्यावाटे आत प्रवेश करुन दुकानाच्य लाकडी काऊंटरच्या दुस-या व तिस-या ड्रॉव्हर मध्ये ठेवलेले ॲल्युमिनीअमचे दोन पत्र्याचे डब्बे यामधील १,९४,५००/- रु रोख रक्कम घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जाधव ९८५०९७५९२० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**